नियमित फौ. ख. क्र.१११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखरसिंह
नि.क्र. २३.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - भारती चंद्रशेखर सिंग,
वय ४३ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. माझे आरोपीसोबत दि.०७.०२.२०११ रोजी मौजा सिपावली ता.पचरुखी, जि.सिवान, राज्य बिहार येथे लग्न झाले होते. मला व आरोपीला एक मुलगा आहे. त्याचा जन्म सन-२०१५ मध्ये झाला होता. आरोपी हे सन-२०१९ मध्ये ग्लोबल लॉजीक नागपूर कंपनीमध्ये कामाला होते. सन-२०१२ ते सन-२०१९ पर्यंत मी आरोपीसोबत नागपूर येथे राहत होते. मी बी.एस.एन.एल. मध्ये जुनियर इंजीनिअर म्हणून काम करीत होती. त्यावेळी डिसेंबर-२०२० मध्ये माझी बदली भिवापूर येथे झाल्यामुळे मी भिवापूर येथे रुमकरुन राहत होती. त्यानंतर आरोपी हे मुंबई येथील रिलायन्स कंपनीमध्ये सन-२०२० पासून काम करतात. कोरोना काळ असल्यामुळे आरोपी हा घरात बसून काम करीत होता. आरोपी हा त्या काळामध्ये काही काळ बिहारमधील आपल्या गावी व काही काळ भिवापूरमध्ये राहून काम करत होता. त्यानंतर सन-२०२३ पासून आरोपी हे नियमीत काम करण्यासाठी मुंबईला गेले. आरोपी हा त्या दरम्यान दर पंधरा दिवसांनी सुट्टीच्या वेळेस भिवापूर येथे येत होते. सन-२०२० मध्ये मी भिवापूर येथे रुम केल्यानंतर माझ्यासोबत माझा मुलगा, माझी ननद व तिच्या दोन मुली माझ्या सोबत राहू लागले.

२. आरोपी ज्यावेळी मुंबईहून सुट्टी घेवून भिवापूर येथे एक दोन दिवसांकरिता येत होते त्यावेळी ते माझ्यासोबत नेहमी भांडण करुन निघून जात होते. सन-२०२२ मध्ये आरोपीने मला मारहाण केल्यामुळे मी त्याच्या विरोधात फिर्याद दिली होती. त्यावेळी आरोपीने मला बेल्टने मारहाण केली आणि ते बिहारला निघून गेले होते. त्यानंतर पंधरा ते वीस दिवसांनी आरोपी पुन्हा भिवापूरला आले त्यावेळी त्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलाविण्यात आले होते. तेव्हा त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये मुलाची शपथ

घेवून सांगितले की, मी पुन्हा मारहाण करणार नाही. त्यानंतर दि.०३.०१.२०२२ मध्ये माझ्या मुलाच्या वाढदिवसाकरिता आरोपी भिवापूरला आले व दोन ते तीन दिवसांनी ते मुलाला तलावावर फिरायला घेवून जाण्याच्या बहाण्याने बिहार येथे घेवून गेले. त्यानंतर अडीच महिन्यांनी त्यांनी माझ्या मुलाला भिवापूर येथे आणले. त्या काळात माझा मुलगा हा सात वर्षांचा होता व नागपूर येथील सांधीपाणी या शाळेत पहिल्या वर्गात होता व ऑनलाईन शिक्षण घेत होता. आरोपी मुलाला घेवून गेला मी त्याला वारंवार फोन करण्याचा प्रयत्न केला, परंतु, तो मला मुलाशी बोलू देत नव्हता.

३. त्यानंतर आरोपी माझ्यासोबत छोट्या छोट्या गोष्टीवर भांडण करीत होते. दि.१२.०४.२०२४ रोजी सकाळी ९.१५ वा. दरम्यान आरोपी हे मुंबईवरुन भिवापूर येथे आली. मी त्यांना पाणीकरिता विचारले. त्यांनी मला सांगितले की, मला तुझ्याशी बोलायचे आहे असे बोलून त्यांनी मला मारहाण सुरु केली. ते मला म्हणत होते की, 'मी तुझ्या कमाईवर जगतो काय?' आरोपी त्यावेळी मला, माझ्या आई वडीलांना व भावाला शिवीगाळ केली. आरोपीने मला लाथांनी मारहाण केली त्यामुळे माझ्या डाव्या हाताला फ्रक्चर झाले होते. त्यावेळी आरोपी मला बोलला की, मी तुला जिवाने मारुन टाकेन, त्याने मला धक्का देऊन फरशीवर पाडले होते. त्यानंतर राजेश कामथे यांची आई मला घराच्या बाहेर भेटली मी तिला घटनेबाबत सांगितले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येते. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

**नि.क्र.२६ वरील आदेशावरुन उलट तपास तहकूब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - १७.०१.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.